(४८) ह. भ. प. श्री. गुरुदेव सेवा मंडळ. गुरुकुंज आश्रम अमरावती (४९) श्री. गुलाबराव रा. जाधव. पुणे. (५०) ह. भ. प. दत्तुशंकर धुमरे. खेडले. (५१) श्री. अरुण नेरळकर नांदेड. (५२) श्री. शरद नेरळकर नांदेड. (५३) सौ. अंजलीबाई पोहेगांवकर. (५४) श्री. शिवाजी तु. धुमाळ. शिर्डी. (५५) श्री. रघुनाथ श्री. पुजारी पुणे. (५६) श्रीराम आठवले, पुणे.

माननीयांच्या भेटी —

(१) मा. श्री. के. के. मेहता, मेजर जनरल दिल्ली.
(२) मा. श्री. आर. एल्. भिंगे, डी. आय. जी. नासिक.
(३) मा. श्री. डी. डी. साठे, आय. सी. एस्. मुख्य सचिव सचिवालय, मुंबई.
(४) संत राधाकृष्ण स्वामीजी मद्रास.

हवापाणी :– शिरडी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्री बाबांची चिलीम !

(चाल :– विडा घ्याहो माधवनाथा)

झुरका मारा साईनाथा ।
सद्‌गुरुनाथा समर्था ।
चिलीम प्रीत भारी ।
होई आनंद पीता ॥ ध्रु० ॥
समाखु हे अज्ञान । ज्ञानाग्निने चेतवून ।
भक्तिपट भिजवून । चिलीम झाली करून ॥ १ ॥
मायारूपी शिळेवर । बसा होउनिया स्वार ।
स्वानंदाचा हा धूर । चिलीम घ्याहो पिऊन ॥ २ ॥
ज्ञाना ज्ञाना निवडून । मी तूं पणा बोळवून ।
प्रसाद अंतरंगी । प्रेम राहो भरून ॥ ३ ॥

— डॉ. एस. एस. तेंडुलकर
नवी ७१० सदाशिव पेठ, पुणे ३०.

# श्री साई

साई स्मरा, साई स्मरा
चुकेल चौऱ्यांशीचा फेरा
श्री गुरूदत्ताचा अवतार
शिरडी क्षेत्री करी संचार
साई येथे, साई तेथे
साई चराचरी वसे ॥ ध्रु० ॥ ॥ १ ॥

त्यागुनिया माझे – मीपण
वंदू साईचे चरण
ब्रह्मरूप बाबा साई
गोदातटी प्रगट होई
'निष्ठा' ठेवा साईपायी
'सबूरी' राखा अंतरी ॥ २ ॥

साई माझा, मी साईचा
त्रिवार सत्य ही वाचा
साठ वर्षे पूर्ण झाली
सद्‌गुरूनाथे कृपा केली ॥ ३ ॥

वरदहस्त ठेवुनि मम शिरी
"अल्ला तेरा भला करे" वदले
नको दंभ, नको कीर्ती
तुझे चरणी जडो मती ॥ ४ ॥

जीर्ण झालेसे शरीर
न जाणे केव्हा होईल अंत
प्रार्थितसे तुज देवा
चिरनिद्रा पदी यावी ॥ ५ ॥

अवस्थीची अवस्था
स्थिर करी सद्‌रूनाथा
चरणी ठेवुनिया माथा
तुजलागी प्रार्थितसे ॥ ६ ॥

— नारायण पुरुषोत्तम अवस्थी (पुणे)
उर्फ अवस्थी काका

# गोदावरी काठी

गोदावरी काठी । पुण्यक्षेत्र शिरडी ।
साईची समाधि । चिरंतन ॥१॥
समाधित राही । संजीवनी साई ।
तिन्ही लोक व्यापूनी । चराचर ॥२॥
सकळ साधनांचे सार । ब्रह्मानंदाचे आगर।
तो हा साईश्वर । सत्यजाण ॥३॥
श्रींची समाधि बरी । वैषम्याची नाही परी ।
हिंदु आणि यवन दोन्ही । सारखेची ॥४॥
घेता समाधि दर्शन । सुखावले लोचन ।
सुखाचा सोपान । साईगुरू ॥५॥
पवित्र गोदा तीर । पवित्र समाधि मंदिर ।
तया साष्टा नमस्कार । आशा म्हणे ॥६॥

– सौ. आशा दयानंद इंगळे जलमंदिर सोसायटी, जे १३, ब्लॉक क्र. १
भांगुर नगर, गोरेगांव (पश्चिम), मुं. ६३

# अवतरे श्री साईमाऊली

गोदावरीच्या तीरी,
अवतरे साई गुरू माऊली ॥
कुणी म्हणती त्या दत्त दिगंबर,
दिसे स्वरूपे कुणा रघुवर,
कुणा भासतो उभा विटेवर,
जोडून समचरणावली ॥१॥
अवतरे साई गुरूमाऊली –
अंगी कफनी वस्त्र वेष्टिले शिरी,
झोळी शोभते वाम करी,
फकीर वेषे राहुनी केल्या,
लिला अगणित शिरडी स्थळी ॥२॥
अवतरे साई गुरू माऊली
फळी टांगुनी मंचक केला,
अग्नी पूजनी सदा रंगला,
तीर्थे सारी नम्र होऊनी,
चरणी त्या धावली ॥३॥
अवतरे साई गुरूमाऊली

– जगन्नाथ नारायण कुलकर्णी स्वाती सोसायटी, प्लॉट नं. ७१
श्रीसाईसदन, पद्मावती, पुणे

# साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्गुरू **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील **'सोनियाचा दिस'** होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्रॉझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय **"झाहले घराचे मंगल देऊळ !"**

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेंच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किंमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :—

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**

पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७

फोन नंबर : ५७ ६२ ९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्रौ ७ ते ९.

Regd. No. MH/BYE/26


भक्तिपूर्ण
आणि
रसाळ
भाषेत



श्रीसद्‌गुरु श्री साईबाबांच्या
जीवनावर पहिली मराठी
कादंबरीका

**साई**

लेखिका :
प्रा. डॉ. – सौ. चारुशिला गुप्ते, एम. ए., पी. एच.डी.

☆

मूल्य रु. ६–५०.

१ ऑक्टोबर ७६ पर्यंत खास साईभक्तांसाठी सवलत रु. ४-५०

सर्व पुस्तक विक्रेत्यांकडे प्राप्त ! (ट. खर्च रु. २–००)

आजच प्रत खरेदी करा : म. ऑ. पाठवा : व्ही. पी. पद्धत नाही.

प्रकाशक : **साहित्य प्रसार केंद्र,**
९, डॉ. देशमुख लेन, विठ्ठलभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई – ४०० ००४.



मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई ३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.

# श्रीसाईलीला



ऑक्टोबर १९७६ ] खास पुण्यतिथी विशेषांक [ किंमत ६० पैसे

# अनुक्रमणिका— ऑक्टोबर १९७६


| | |
|---|---|
| १) संपादकीय | — |
| २) श्रींच्या लीला | — श्री. सूर्यकांत गर्जे |
| ३) सद्‌गुरू | — श्री. गणपत सामंत |
| ४) युगावतार श्रीसाईबाबा | — श्री. चंद्रकांत सामंत |
| ५) असे भक्त ... अशी भक्ती | — श्री. सुरेश सातपुते |
| ६) भक्त | — श्री. गं. रा. भट |
| ७) आशीर्वाद | — डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ८) श्रीसाईलीला | — कै. श्री. बी. आर. काकडे |
| ९) कै. श्री. काकासाहेब अवस्थि | — |
| १०) वाचकांचा पत्रव्यवहार | — |
| ११) श्री. मनोहरपंत पितळे | — सदानंद चंदवणकर |
| १२) ग्रंथभेटींचा स्वीकार | — |
| १३) शिर्डीवृत्त—माहे ऑगस्ट-७६ | — |
| १४) साई ध्यान गान | — श्री. सदाशिव गर्दे |
| १५) साईमहिमा | — सौ. प्रतिभा नागवेकर |
| १६) पावन शिरडी | — श्री. दत्ताराम बारस्कर |
| १७) साई माऊली | — सौ. कलावती चव्हाण |
| १८) एक आस | — श्री. आर. बी. जोशी |
| १९) श्री गीतसाई | — श्री. चकोर आजगांवकर |
| २०) विसरू कशी मी श्री बाबाला | — कु. शालिनी देशपांडे |
| २१) आलो तुझिया द्वारा | — श्री. राम आसेकर |
| २२) ओवी गाईन साईनाथा | — सौ. सुशिलाबाई हजारे |
| २३) पूर्वपुण्य | — शशिकला साळगावकर |
| २४) जीव शिर्डीत रमला | — श्री. के. एस. देशमुख |
| २५) शिर्डी माझे माहेर | — सौ. कमल सांडभोर |
| २६) शिरडी नंदनवन | — श्री. श्रीधर प्रभुणे |
| २७) सद्‌गुरु साईनाथाचा धावा | — श्री. एन. आर. देशपांडे |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

बाबा तव स्वरूपदर्शना--।
वांचून कांहीं रुचेना मना ।
वाटे आणावें तेंच ध्याना ।
ठेवावें लोचनांसमोर ॥९॥

केवळ शुद्ध ज्ञान मूर्ति ।
व्हावया आत्यंतिक सौख्यमूर्ति ।
नाहीं तुझिया पायांपरती ।
आणिक गति आम्हांतें ॥१०॥

काय ती तव भित्याची बैठक ।
दर्शना येती भक्त अनेक ।
ठेवूनियां पायीं मस्तक ।
प्रेमें निजसुख लुटीत ॥११॥

तोही तुझा पाय कैसा ।
शाखा-चंद्रन्याय जैसा ।
पादांगुष्ठ कवळी तैसा ।
दर्शन जिज्ञासा पूरवी ॥१२॥

कृष्ण पक्षाची पंचदशी ।
अमावास्या अंधारी निशी ।
उलटतां चंद्र दर्शनाची असोसी ।
होते सकळांसी साहजिक ॥१३॥

— श्रीसाईसच्चरित् अध्याय २२ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे ] ऑक्टोबर ७६ [ अंक ७

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

स. न. वि. वि.

दरवर्षीप्रमाणे श्रीसाईबाबांच्या पुण्यस्मरणार्थ हा पुण्यतिथी विशेषांक आमच्या वाचकांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे. बाबा समाधिस्थ होऊन आता ५८ वर्षांचा काळ लोटला असला तरी त्यांचे अस्तित्व आणि त्यांच्या उपस्थितीची जाणीव आम्हांला क्षणोक्षणी जाणवत आहे व पदोपदी त्याची प्रचीती येत आहे.

श्रीसाईबाबांनी केवळ लोककल्याणासाठी या भूतलावर अवतार घेतला व ते आमच्यात वावरले. आमच्यातून वावरताना आम्ही परस्परांशी बंधुभावाने व माणुसकीने वागावे, त्याचप्रमाणे जन्माला आलेल्याचे सार्थक कशात आहे हे जाणावे यासाठी ते अहर्निश धडपडले, झिजले व परोपरीने त्यांनी लोककल्याण साधले. बाबांचा जन्म केवळ लोकोपकारार्थच होता, त्यांनी आपले सारे जीवन परोपकारार्थ वेचले. अशा या अवतारी महापुरुषाची थोरवी आम्ही ती काय गावी ?

केवळ जगाचिया उपकारा । चुकवाया जन्ममरणाचा फेरा ॥
त्यागुन निर्गुण निराकारा । आले हे आकारा संतजनी ॥

श्रीसाईबाबा आज देहाने आमच्यात वावरत नसले तरी आमच्या कल्याणास शंभर टक्के कारणीभूत होणारी त्यांची शिकवण जोपर्यंत आमच्या पुढे आहे व तिचे आचरण जोवर आमच्याकडून होत राहील तोपर्यंत बाबा आमच्या सन्निध राहून आम्हास मार्गदर्शन करीत आहेत अशीच श्रद्धा प्रत्येकाने बाळगली पाहिजे.

बाबा शिकवणुकीच्या रूपाने आजही आमच्यात वावरत आहेत. त्यांच्या शिकवणुकीची शिदोरी ज्यांनी जवळ बाळगून ठेवली आहे त्यांचे अकल्याण केव्हाही होणार नाही आजवर त्यांचे कल्याण होत आलेले आहे. त्यांच्या मनःकामना पूर्ण झालेल्या आहेत व त्यांना संकटातून मार्ग सापडलेला आहे.

तुम्ही कोणी कुठेही असा । भावे मजपुढे पसरितां पसा ।
तुमचिया भावा सरिता । रात्रंदिस उभाच ॥ असे ज्यांनी कायमचे आश्वासन देऊन ठेवले आहे व ज्याची प्रचिती भक्तांना आजवर आली आहे व आजही येते अशा महाभागाचे महत्त्व आम्ही ते काय गावयाचे ?

श्रीसाईबाबांचे जीवन कार्य, त्यांनी प्रगट केलेले सद्‌गुण व त्यांचे सारे आचरण हे प्रेरणादायी आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन आमचे जीवन फुलवायचे आहे, सुगंधित करावयाचे आहे. श्रीबाबांचे पुण्यस्मरण म्हणजे त्यांच्या सुंदर शिकवणुकीचे चिरंतन स्मरण होय. ते प्रेरणादायी स्मरण आमच्याकडून अहर्निश घडावे, जीवनभर आम्हाला ते प्रेरक व तारक होऊन रहावे हीच अशा प्रसंगी भक्तिभावपूर्वक प्रार्थना आपण सर्वांनी करूया.

# श्रींच्या लीला

—श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे
८० शिवाजीनगर, पुणे

● श्री सद्गुरु साईनाथ महाराज एक महान् जागृत दैवत आहे. त्यांच्या ह्यातीत, त्यांच्या महासमाधी नंतरसुद्धा अनेक भक्तांना श्रीबाबांनी उद्धरून नेले. अनेक भक्तांना आजही श्रीबाबा त्यांच्या संकटकाळी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मदत करतात व त्यांना संकटमुक्त करतात. याची प्रचीति घेणारे भक्त असंख्य आहेत. श्री बाबांची कृपा झाल्यावर उणीव कशाची ? मनात श्रद्धा व सबूरी असली की, श्रीबाबा त्यांच्या पाठीशी उभे राहिलेच म्हणून समजा. श्रीबाबा हे परमेश्वराचेच अवतार होत. त्यांचा सर्वत्र सर्वकाळ वास असतो. ते सर्वव्यापी आहेत.

भारत ही थोर संत-महंत आणि देवतांची पवित्र भूमि आहे. देवतांच्या पदस्पर्शाने पवित्र, पावन आणि पुनीत झालेल्या या भरतवर्षात अनेक चमत्कार नित्य घडत असतात. माझ्या या उक्तीला दुजोरा देणारी काही उदाहरणे मी इथे नमूद करीत आहे.

१९३४ साली मुंबई येथे अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाची परिषद भरली होती. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी बाबू राजेंद्रप्रसाद होते. परिषद आटोपल्यावर बाबू राजेंद्र प्रसाद सहकुटुंब श्री रमण महर्षि यांना भेटण्यासाठी गेले होते. ३।४ दिवस ते आश्रमात राहिले. परत येण्याचे दिवशी ते श्रीरमण महर्षिंना म्हणाले, "म. गांधींसाठी आपण संदेश द्याल का ?" श्री. रमण महर्षि हसून उत्तरले— "मी काय संदेश देणार ? प्रत्यक्ष परमेश्वरशक्तीच म. गांधींच्या रूपाने कार्य करीत आहे."

श्री क्षेत्र अयोध्या येथे कनक भवनमध्ये प्रभु रामचंद्र व सीतामाई यांचे अति भव्य व मोहक मंदिर आहे. जवळच सायन कुंज बाग आहे. या बागेतील फुले दररोज प्रभु रामचंद्रांना वाहिली जातात. तेथील अमृतासारखे मधुर पाणी श्रीरामचंद्रांसाठी चांदीच्या तांब्यात सकाळ संध्याकाळ भरून ठेवले जाते. सुमारे २५ वर्षांपूर्वीची घटना आहे. मंदिरापासून सुमारे एक मैलभर अंतरावर राहणाऱ्या एका भक्ताच्या स्वप्नात एके दिवशी प्रभु रामचंद्र गेले व म्हणाले, "मला आज खूप तहान लागली आहे."

सकाळी उठल्यावर तो भक्त मोठ्या विचारात पडला. स्वप्नाचा तो अर्थ लावू लागला, परंतु त्याला त्याचा काहीच उलगडा होईना म्हणून अखेर तो मंदिराच्या प्रमुखाकडे गेला. त्याने सर्व स्वप्न कथन केले. मंदिराच्या प्रमुखानाही थोडा अचंबा वाटला. त्यांनी तातडतोब पुजाऱ्यास बोलावणे धाडले.

पुजारी येताच त्यांनी विचारले– "काल रात्री प्रभु रामचंद्राची शेज आरती झाल्यावर आपण तांब्या-फुलपात्रात पाणी भरून ठेवले होते का ?"

पुजाऱ्याने आठवण्याचा प्रयत्न केला व उत्तरला, "क्षमा असावी साहेब, मी पाणी भरून ठेवावयास विसरलो."

लगेच तातडीने तिघेही मंदिरात गेले. मंदिराचा दरवाजा उघडला आणि पाहतात तो तांब्या व फुलपात्र रिकामे ! ताबडतोब पाणी भरून ठेवले गेले.

* * * वेदाद्रि हे एक महान तीर्थक्षेत्र कृष्णा नदीच्या काठी, कृष्णा जिल्ह्यात आन्ध्र प्रदेशमध्ये आहे. तेथे भगवान नरसिंहाचे अतिशय सुंदर मंदिर आहे. दररोज शेजारतीच्या वेळी श्रीनरसिंहाची मूर्ति पाळण्यात ठेवून संपूर्ण आरती होईपर्यंत दोरीला धरून पाळणा हलविला जातो. भगवान नरसिंहाना पाळण्यात झोपविले जाते व मग भक्त मंडळी व पुजारी मंदिर बंद करून घरी जातात.

सुमारे चाळीस वर्षापूर्वीची घटना आहे. मंदीराचे एक जमीनदार विश्वस्त यांच्या स्वप्नात एके दिवशी भगवान नरसिंह गेले आणि म्हणाले,

"तू अगदी आरामात, मजेत पलंगावर झोपला आहेस. इकडे आमची अवस्था येऊन पहा तर जरा. पाळण्याची दोरी केव्हा तुटून पडेल सांगता येत नाही."

जमीनदार झोपेतून जागा झाला आणि तडक मंदिराकडे धावत आला. मंदिराचे दार उघडून पाहिले आणि आश्चर्यचकित झाला. पाळण्याची दोरी एके ठिकाणी इतकी नाजूक झाली होती की, कोणत्याही क्षणाला दोरी तुटून पाळणा जमिनीवर कोसळला असता. त्याच दिवशी त्याने ती दोरी काढून नवी दोरी बांधली.

* श्री. दिलीपकुमार रॉय हे महायोगी अरविंद यांचे परमभक्त. त्यांनी पुणे येथे अरविंद आश्रमाची स्थापना केली. काही वर्षापूर्वी एका भक्ताने त्यांना श्री साईनाथ महाराजांची एक मूर्ति भेट म्हणून दिली. इतर अनेक देव-देवतांच्या मूर्तींबरोबरच ही श्रीबाबांची मूर्ति पण त्यांनी आश्रमाच्या आवारात एका चौथऱ्यावर बसविली. एके दिवशी श्री. दिलीपकुमार रॉय यांना स्वप्न पडले- स्वप्नात श्रीबाबा त्यांना म्हणाले– "मला बाहेर थंडी खूप वाजते. कोपऱ्यात, व्यवस्थित अशा ठिकाणी मला ठेव."

या स्वप्नाचे गांभीर्य श्री. दिलीपकुमार रॉय यांनी जाणले व त्वरित एक सुंदरसे मंदिर आश्रमाच्या आवारात बांधले व तेथे श्रीबाबांची स्थापना करण्यात आली.

श्रीबाबांनी हयातीत अनेक लीला केल्या व अद्यापही त्याची प्रचीति भक्तांना येत आहे. भक्तांना संकटातून वाचवून त्यांच्यात श्रद्धा, भक्ती व विश्वास निर्माण करून त्यांची जीवननौका योग्य दिशेने हाकारण्याचे दिव्य कार्य श्रीबाबा अखंड करीत आहेत.

# सद्गुरू

—श्री. गणपत गोविंद सामंत, एम्. ए.
३१६९ कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण निवास, मुंबई—४.

● साधु संतांचा सुगावा लागताच त्यांचे एकदा तरी दर्शन घ्यावयाचे हा माझा लहानपणापासूनचा छंद आहे व आजपर्यंतच्या एकंदरीत अनुभवावरून बहुतेक भोंदूचेच प्रमाण जास्त. तरीसुद्धा माझा हा छंद अजून चालूच आहे व 'गुरू' मिळाल्यानंतरच माझा छंद बंद पडेल असे वाटते. नशीब एवढेच की या नादाने मी कुठल्याच भोंदूच्या नादी लागलो नाही तर एक गुरूसमान सत्पुरुष भेटले व त्यांच्याच कृपेने 'श्रीसाई बाबा' वरील भक्ति अनेकपट वाढली व 'श्रीसाई'ना गुरू मानून मी सद्गुरूच्या शोधात आहे.

साधकाला गुरूची आवश्यकता आहे व या विषयावर मी बरेच वाचन केले. पण पारख करून 'गुरू' ठरविण्याची पात्रता अजून माझी नाही. अशाच शोधात असतान मला एका पौराणिक दत्त मंदिरात 'सद्गुरू' लाभले. पण त्यांचे 'गुरुत्व' मी अजून स्वीकारले नाही पण त्यांना मी गुरुसमान मानतो. या सत्पुरुषाविषयी येथे मी माहिती देऊ शकत नाही, कारण प्रसिद्धी व भक्तगण यापासून माझे सद्गुरू दूर राहू इच्छितात. सदैव साधनेत असलेले व 'श्रीसाईंना' गुरू मानणारे हे सत्पुरुष एका अरण्यात राहातात व या सत्पुरुषाची सविस्तर माहिती कालांतराने प्रसिद्ध करण्याचा माझा मनोदय आहे. पाहू योग केव्हा येतो.

ज्ञानाने गुरू लाभणे कठीण. बुद्धिवादी साधकाला सद्गुरूची गाठ होणे कठीण. गाठ पडली तर श्रद्धा बसणे कठीण व त्यात श्रद्धा बसली तर त्याच्या संगतीत रहायला मिळ णे कठीण. पण असे जरी असले तरी गुरू लाभल्याशिवाय पूर्तता होत नाही.

'श्रीसाईबाबांनी' गुरू मानला व त्याला दोन पैसे गुरुदक्षिणा म्हणून दिले असे श्रीसाईसच्चरितामध्ये नमूद केलेले आहे —

“ निष्ठा आणि सबूरी दोन ।
हेच ते पैसे, नव्हते आन ।
म्यां ते तेव्हांच टाकिले देऊन ।
तेणें मज प्रसन्न गुरुमाय ॥
तूं मजकडे अनन्य पाहीं ।
पाहीन तुजकडे तैसाच मीही ।
माझ्या गुरूने अन्य कांहीं ।
शिकविले नाहींच मजलागीं ॥”

वरील श्रीसाईबाबांच्या बोलावरून हेच सिद्ध होते की त्यांनी आपल्या गुरूला 'श्रद्धा आणि सबुरी' हे दोन पैसे गुरूदक्षिणा म्हणून दिले. याचाच अर्थ साधकाने गुरू शोधात जास्ती न राहता श्रद्धा ठेवून गुरू मिळण्याची वाट पाहाणे चांगले. अशी सद्‌गुरू कृपा होण्याला पूर्वपुण्याई असावी लागते. तरीसुद्धा यमनियमादि नेमाने, सर्वांभूती प्रेमाने, अखंडित नामस्मरणाने असा योग येण्याची बरीच शक्यता असते.

आपल्या नेहमीच्या व्यवहारात व कष्टमय जीवनात नामस्मरण हेच सुलभ साधन आहे. नामस्मरण हे आपल्या कुलदैवतेचे असेल किंवा श्रीसाई, श्रीअक्कलकोट महाराज अशा सत्पुरुषांचे असेल. ज्याच्यावर आपली पूर्ण श्रद्धा आहे त्याचेच नाम घेणे इष्ट होईल. या बाबतीत इतरांचे अंधानुकरण न करता आपली भक्ति आपणास प्रिय असलेल्या देवावर किंवा साधुसंतावर केंद्रित करणे सोईस्कर ठरते.

श्रीसद्‌गुरूनाम पवित्र ।
    हेंचि आमुचें वेदशास्त्र ।
'साईसमर्थ' आमुचा मंत्र ।
    यंत्रतंत्रही तें एक ॥
'साई साई' ति नामस्मरण ।
    करील सकल कलिमल दहन ।
वाणीश्रवणगतपापभंजन ।
    एक लोटांगण घालितां ।
दोन हात एक माथा ।
    स्थैर्य श्रद्धा अनन्यता ।
नलगे दुजे साईनाथा ।
    एक कृतज्ञता ते व्हावी ॥

ईश्वराचे दर्शन होण्यासाठी त्याचे शाश्वत व अमृतमय नामस्मरण करण्यावाचून दुसरा उत्तम मार्ग नाही. हरिकीर्तन हा नामस्मरणाचा एक प्रभावी मार्ग आहे. मानसशास्त्र दृष्टया एकाच विचाराने भरलेली अनेक माणसे एकत्र येतात तेव्हा सर्वांचे मिळून एक मोठे मन तयार होते. त्या मनाची शक्ति व्यक्तिच्या मनापेक्षा अधिक असते. एकांतात नास्मरण करीत असता उत्कट भावना प्रदीप्त होणे कठिण जाते तसे इतर विचारहि आंदोलने निर्माण होण्याची शक्यता असते. समूहामध्ये मोठ्याने नाम घेता घेता ईश्वराबद्दल प्रेमभावना चटकन जागृत होते, मन ईश्वर भजनात तल्लीन होते. अशाप्रकारे प्रेमभावना व लीनता सामुदायिकपणे पराकोटीस जाऊन आत्मसाक्षात्कार होतो. नामस्मरण व हरिकीर्तन यामुळे हृदयामध्ये व चराचरामध्ये देव प्रकट होतो व जडजीवांचा उद्धार होतो. योगयाग, तपसाधने त्यापुढे अनाथ होतात.

संसारात गुरफटलेल्या साधकास सद्‌गुरू प्राप्तिसाठी नामजप हाच सुकर व सोपा मार्ग आहे. ज्या कर्मांनी देहधारणा होते त्याला प्रारब्ध म्हणतात. प्रारब्ध भोगल्याशिवाय गत्यंतर नाही. प्रारब्ध म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ यांचा अनिवार्य संबंध. तरीसुद्धा सद्‌गुरू प्राप्ति झाल्यावर

इतर देव सारे मायिक ।
गुरूचि शाश्वत देव एक ।
चरणी ठेविलां विश्वास देख ।
'रेखेवरी मेख मारी' तो ॥

हासुद्धा अनुभव का येऊ नये ?

जर प्रारब्धानुसार सर्व व्हावयाचे असेल तर भक्तिमार्गात पडण्याचे कारणच काय ?

साधक चार प्रकारात मोडतात. पहिला प्रकार साधक सकाम असून थोडया पण खऱ्या प्रेमाने भक्ति करतो. दुसऱ्या प्रकारात साधक सकाम असला तरी इच्छापूर्तिकरिता नाही पण केवळ प्रेमाने भक्ति करतो. तिसऱ्या प्रकारात साधक अंतर्मुख होऊन वासना क्षीण होऊन भक्ति करतो व चवथ्या प्रकारात साधन भक्तिप्रेमाने सूक्ष्म झाल्याने सगळीकडे भगवंत पाहू लागतो.

सर्वसाधारण बहुसंख्य पहिल्या व दुसऱ्या प्रकारात असतात. प्रयत्न करून हमखास मिळणारे यशसुद्धा दुरावले की आपणास वाटते की प्रयत्नाला भक्तिची जोड दिल्यास यशप्राप्ति होऊ शकेल व तसा अनुभव आला की त्याची भक्तिमार्गावर श्रद्धा वाढते.

वरील सर्व विचार निरनिराळ्या ग्रंथांवर आधारले आहेत. फक्त त्या विचारांचे एकत्रीकरण मी केले आहे. हेतु एवढाच की सद्‌गुरू मिळवणे सर्वसाधारण साधकाच्या आटोक्याबाहेर असल्यामुळे त्या मार्गी न जाता आपण नामजपाने भक्ति वाढविणे व ही भक्ति वाढविता वाढविता अशी एक परिस्थिती निर्माण होईल की सायास न करताच 'सद्‌गुरू' प्राप्त होईल. साखर ठेवल्यानंतर जसे मुंग्यांस आमंत्रण देण्याची आवश्यकता नसते, तसेच आपण भक्तिरूपी साखर पेरल्यानंतर सद्‌गुरूचे आगमन होणारच. याच अनुभवातून मी जात आहे.

श्रीगोंदवलेकर महाराजांनी ज्यावेळी राममंदिर बांधावयास घेतले त्यावेळी राममूर्ति कोठे असे त्यांच्या भक्तांनी त्यांना विचारले. देऊळ बांधणे माझे काम आहे व त्यात श्रीरामाने येऊन राहाणे त्याचे काम आहे असे उत्तर दिले. श्रद्धेचे फळ हे मिळालेच पाहिजे.

सामर्थ्य मोठे श्रद्धेचे ।
शक्य होते अशक्याचे ।
श्रद्धा नसता चराचराचे
शून्य मूल्य होतसे ॥

आपण कर्मबंधनामुळे पराधीन आहोत (नशीब) हे तत्त्व समजून जगात वागण्याची जरूरी आहे. आपल्या पूर्वकर्मानुसार घटना घडतात. हा नियम अबाधित आहे. तो कधीहि बदलत नाही. कारण तशी पोलादी चौकट असते. ती कधीही तोडता येत नाही. परंतु दुःखाची गोष्ट अशी की, माणूस सर्व गोष्टी समजूनसुद्धा त्याला कळत नाही की, 'पापकर्म' वाईट असून त्याचे फळ भोगावेच लागेल. तो भोग कधीही चुकविता येणार नाही. कोणत्या पापाचे फल तुम्ही आज भोगत असता हे परमेश्वर कधीही सांगत नाही, आणि म्हणून तुम्हाला सर्वसाधारण रीतीने समजायला हवे की, पूर्वी केलेल्या पापकर्मांचे फळ आज मिळत आहे. ते आपणास धडा देण्यासाठी आहे आणि असा धडा मिळून आपला फायदा होत आहे. कारण त्यामुळे पुन्हा पापकर्म करू नये असे आपल्या मनावर ठसत असते. तुम्हाला समजायला हवे की, तुम्ही स्वतःच तुम्हास बांधवून टाकता तसे सोडवूही शकता. त्रिगुणांच्या तावडीत सापडून तुम्ही बांधून घेता परंतु तुमच्यातील अशिक्षितांमध्येसुद्धा जो विवेक असतो तो वापरून तुम्ही स्वतःला सोडवून घेऊ शकता.

तुम्ही तुमचे नशीब घडविता. स्वतःस सुख प्राप्त करून घेता अथवा दुःख मागून घेता. तुम्ही स्वतःच जन्मातली तुमची पातळी ठरविता. तुमचे विचार, इच्छा, कृती यामुळे तुमच्या पुढच्या जन्मातील आयुष्य ठरते–तुम्हास जन्म दिला जातो.

नशीबालाच 'कर्म' म्हणतात. ते तुमचे तुम्हीच घडविता व पुसूनही टाकू शकता. एका ठराविक मर्यादेपुढे माणूस घटना घडवू शकत नाही. मग तुम्ही त्याला नशीब किंवा दुसरे काही म्हणा. यात मुख्य गोष्ट परमेश्वराचे आधिपत्य नम्रपणे मानणे ही आहे.

तुमची सद्यःस्थिती भूतकालाशी निगडीत झाली आहे, त्यामुळेच तुमचे भविष्य घडणार आहे. या जन्माची शिदोरी तुम्हीच पूर्वजन्मातून आणलेली आहे. तुम्ही प्यालेले पाणी घामावून बाहेर जाते. तसे तुम्ही पूर्वी साठविलेले कर्म (फलरूपाने) विनतक्रार कर्म करून ते भोगून नाहीसे होते. येथे तक्रार न करणे हे फार महत्त्वाचे असते.

नशीब टाळता येत नाही, ही कल्पना चूक आहे. परमेश्वराची कृपा झाली तर नशीब टाळता येते, कारण, ती सर्वश्रेष्ठ परमेश्वराची कृपा आहे हे लक्षात ठेवा. अशी कृपा झाली म्हणजे, कर्माचे परिणाम मॉर्फीन इंजेक्शन दिल्याप्रमाणे जाणवत नाहीत किंवा कर्म (नशीब) वरचेवर त्रास देत असते तसे ते देऊ शकत नाही. म्हणजेच नशीब क्षीण बनते, किंवा नशिबाचा परिणाम होण्याचेच थांबते. तुम्हाला पूर्व कर्मानुसार नाम व रूप प्राप्त होते. परंतु त्यामध्ये साधनेमुळे फरक होऊ शकतो.

हे सर्व साधण्यासाठी 'नामस्मरण' हा एकच मार्ग. त्यातूनच सद्गुरुप्राप्ति व परमेश्वरप्राप्ति.

या विषयावर लिहावे तेवढे थोडेच. पुन्हा एकदा येथे नमूद करतो की वरील विचार हे लेखकाचे (माझे) नसून ते सत्पुरुषाचे आहेत व मी फक्त त्याचा वारंवार अनुभव घेत आहे व मला पटल्यामुळे श्रीसाईभक्तास त्याचा उपयोग व्हावा म्हणून देत आहे.

# युगावतार श्री साईबाबा - ६

( साईबाबा सत्संगमंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने )

अनुवादक : **श्री. चंद्रकांत दामोदर सामंत**
डोंगरे मॅनशन, ताडदेव रोड, मुंबई ७

● सुरत येथील श्रीसाईमंदिरात नित्यनेमाने दर्शनाला येणाऱ्या एका भक्ताविषयी ही गोष्ट आहे. भक्तांच्या संकटात त्यांच्या हाकेला धावून जाणाऱ्या श्रीबाबांच्या तत्परतेवर ह्या भक्ताची दृढ श्रद्धा होती.

एके दिवशी ह्या भक्ताची पत्नी भल्या पहाटे काही कामानिमित्त घराबाहेर पडली असता एका भामट्याने तिच्या गळ्यातील सोन्याचा किंमती दागिना हिसका देऊन सफाईने पळविला. त्या भक्ताची आर्थिक परिस्थिति जेमतेमच असल्याकारणाने दागिन्याच्या चोरीचे त्याला मनस्वी दुःख झाले. त्याने पोलीसात रीतसर तक्रार नोंदविली. बरेच दिवस झाले तरी चोराचा पत्ता लागेना. अशा वेळेस त्याला एकाएकी श्रीसाईबाबांची तीव्रतेने आठवण झाली. आतापावेतो श्रीबाबांच्या अगाध लीला त्याच्या कानावर वेळोवेळी आल्या होत्याच. एके दिवशी त्याने श्रीसाईमंदिरात जाऊन श्रीबाबांची करुणा भाकली व आपला दागिना मिळवून देण्यासाठी त्यांना मनोभावे प्रार्थना केली. एवढेच नव्हे तर दागिना परत मिळाल्यानंतर मंदिराला यथाशक्ति भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी त्याने पोलीस स्टेशनवर जाऊन चोरीचा तपास जारीने करण्याविषयी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. ह्या गोष्टीला काही दिवस होऊन गेल्यानंतर दुसऱ्याच एका खटल्यात संशयित म्हणून पकडल्या गेलेल्या एका आरोपीने आपणच वरील सोन्याचा दागिना चोरला असल्याची कबुली दिली व तो दागिना जसाच्या तसा परत केला.

भक्तांनी कळकळीने केलेल्या प्रार्थनेला परमेश्वर किती जागरूकतेने प्रतिसाद देतात त्याचा प्रत्यय आणून देणारी वरील कथा आहे. अशा दृष्टांताचा हेतू केवळ चमत्कारापुरताच नसून सद्‌गुरुचरणी श्रद्धा दृढ करण्यासाठी व मानवाची आध्यात्मिक पातळी उंचावण्यासाठी त्यांचा निश्चितपणे उपयोग होत असतो. ●

# असे भक्त .... अशी भक्ती ....!

– सुरेश शां. सातपुते
सातपुते स्टोअर्स, ४९८ जाम बिल्डींग
डॉ. आंबेडकर रोड,
लालबाग, मुंबई नं. १२.

एके प्रसंगी, एक पोचलेला "साईभक्त" समुद्र किनाऱ्यावर निवांत बसला होता. अंगावरील कपड्यांची शुद्ध नाही... केस दाढी वाढलेली... क्षितिजाशी एकटक दृष्टी लावलेल्या "साईवेड्यास" पाहून हवालदार आपले दांडूके सावरीत त्याच्या पाशी आला... व आपल्या नेहमीच्या अरेरावी थाटात त्याला विचारू लागला ...

"काय...रे ! इथं काय करतोयस ?"

"......साईध्यान !"

"राहतोस कुठं...?"

"...साई नगरी !"

"नाव काय तुझं ?"

"...साईदास !"

"झोपतोस कुठं ?"

"...साईच्या छायेत !"

हवालदार या उत्तरांनी अवाक् झाला !

"खातोस काय ?"

"...साईनाम !"

"पितोस काय ?"

"...साईनाम !"

आता मात्र हवालदार पुरा वैतागला !

"बापाचं नाव काय ?"

"साई...बाबा !"

"आईचं नाव काय ?"

"...स...आई...!"

हवालदार चिडून उद्गारला "काय सारखं "साई...साई" बोंबलतोयस ?

"......"

"थांब तुला या दांडुक्याचाच प्रसाद देतो ! मग पहातो काय म्हणतोयस ते !

" ...साई प्रसाद !"

" आणि या प्रसादाने तुझं पेकाट मोडलं तर ?"

" ...साईंची इच्छा !"

हवालदारांचा तोल सुटत चालला...!

" एका प्रश्नाचं उत्तर धड देत नाहीस ! तुला कशाची एवढी नशा चढलीय !"

" साईनामाची !"

हवालदारांचा तोल संपूर्ण सुटला ! त्याने "साईभक्ताच्या" एक श्रीमुखात भडकावली... " आता कुणाला लागलं...?

" साईना !"

हवालदाराचा आता मात्र कडेलोट झाला ! त्याने " साईभक्ताच्या " बखोटीस धरले...आणि फरा फरा ओढीत चौकीवर नेले ! "साईभक्त" तिथंही त्याच आरामात बसला ! " फार गमजा करीत होतास...आता कसं वाटतयं...?

" ...साईनगरीत आल्यागत !"

" थांब तुला...बरोबर पाच वर्ष डांबूनच ठेवतो !"

" ...साईलीला !"

हवालदाराने आपलं डोकं खरा...खरा खाजवलनं ! काय करावं म्हणजे हा दुसरा शब्द बोलेल ?

" तुला मी पाच रुपये दिले तर ...?

" ...साईंची इच्छा ...!"

" तुला मी...सोडून दिले तर...?"

" साईंची मर्जी...!"

" तुला मी नवे कपडे दिले तर ?"

" ...साईंची कृपा...!"

आता हवालदारास उपरती झाली... साईभक्तांची बाबांशी झालेली तद्रूपता...पाहून... त्याचे डोळे भरून आले ! त्याच क्षणी त्याने स्वतःला "साईभक्तांचे" पायाशी लोटून दिलं ...!

" मला माफ करा...!

" साईनाथच ... माफ करतील !"

हवालदाराने १० रु. ची नोट काढून "साईभक्ताचे" हातात कोंबली...

" तुम्ही जाऊ शकता...!"

" ...साईंची मर्जी !"

साईभक्त पोलीस चौकीतून बाहेर पडला ... दाराशी एक अंध भिकारी हात पसरून उभा होता...!

साईभक्ताने कागदाचा कपटा टाकावा त्याप्रमाणे दहा रुपयाची नोट त्याच्या हातात टाकली !

" साईनाथार्पणमस्तू !"

असे बोलून काही घडलेच नाही अशा थाटात तो पुढे चालू लागला. दरवाजात उभे राहून त्याचे हे कृत्य पहात असलेला हवालदार नंतरही कितीतरी वेळ त्याच्या पाठमोऱ्या आकृतिकडे पहात होता !

...दुसऱ्याच दिवशी हवालदाराचे घरी बाबांची एक सुंदर तसबीर टांगली गेली!

वाचकहो,

तुमची, आमची साईचरणी अशी तद्रुपता कधी होईल ...?

## साईभक्तांनो सूचना पाठवा हं !

१९७८ साली विजयादशमीला भगवान श्री साईबाबांच्या महासमाधीला साठ वर्षे पूर्ण होतात. या निमित्य पुढील १९७७ च्या विजयादशमीपासून तो १९७८ च्या विजयादशमी अखेरपर्यंत श्रीबाबांचा साठावा पुण्यतिथीमहोत्सव साजरा करण्याचे श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीने ठरविलेले आहे. संस्थानकडे या महोत्सवाचे संबंधात अनेक योजना व विविध कार्यक्रम – उपक्रम आहेतच, तरीपण आमच्या साईप्रेमी वाचकांनी हा महोत्सव कशा प्रकारे साजरा करावा याबाबत आपले काही सुविचार, योजना, उपक्रम, कार्यक्रम थोडक्यात सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस लिहून ते संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन फ्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ येथे त्वरित पाठवावेत.

सुयोग्य सूचनांचा जरूर परामर्श घेतला जाईल. आपल्या सूचना नव्हेंबर १९७६ अखेरपर्यंत पाठवाव्यात.

# ० ० ० भक्त ० ० ०

– श्री. गं. रा. भट,
संदेश हौसिंग सोसायटी, सोनावाला रोड,
गोरेगाव.

● मला पुष्कळदा विचार पडतो, मी भक्त आहे का? उत्तर नकारार्थी देणे भाग पडते. भक्त हे विशेषण किंवा उपाधी मला लावून घेता येईल का? उत्तर नकारार्थी देणे भाग पडते. मी रोज साईबाबांची पोथी वाचतो. रोज आरती करतो. तरीपण अंतर्मन सांगते की मी भक्त नाही. मग भक्त म्हणजे काय? भक्त कोणाला म्हणावे? भक्त या शब्दाचा अर्थ काय? भक्त म्हणजे जो कोणापासून तरी विभक्त होऊ शकत नाही, विभक्त केला जाऊ शकत नाही. विभक्त म्हणजे वेगळा किंवा निराळा. म्हणजे जो कशाशी तरी एकरूप झालेला आहे, काया, वाचा, मने, जो निराळा नाही, वेगळा नाही तो भक्त. भक्त हा शब्द आपण इतक्या सवंगपणे वापरतो, स्वस्तपणे वापरतो कीं तो शब्द अर्थाच्या दृष्टीने साफ गुळगुळीत झाला आहे असे मला वाटते.

मग प्रश्न असा पडतो भक्ती ही खरोखर इतकी सोपी आहे का? 'भक्ती ही बाभुळ वनीची वाट, काटा टाळूनी टाका पाय.' असे भक्तीचे श्रीसाईसच्चरितात वर्णन केले आहे. इतके खरे की मन विषण्ण होते. 'कृपण वावरो कवण्याही गावा। चित्तासमोर पुरलेला ठेवा। जैसा तयासी अहर्निश दिसावा। तैसाचि वसावा साई मनी ॥३–१८५॥ भक्तीची ही अवस्था प्राप्त होत नाही हे खरे. आम्हाला वित्त अहर्निश दिसते पण साई दिसत नाही – असे का? अंतरीची तळमळ नाही हेच त्याचे कारण. बाबांची आठवण येते, त्यांचे नामस्मरण मी करतो. पण त्या आठवणीने प्रत्येक वेळी डोळ्यात अश्रू का येत नाहीत? काहीतरी कमी पडते, काहीतरी चुकते. काहीतरी ढोंग घडते, ज्यामुळे मी फसतो. तहानेने व्याकूळ झालेला माणूस पाण्याच्या थेंबासाठी कंठी प्राण येऊन तळमळत असतो तशी भक्तीची तळमळ का लागत नाही? प्रश्न कठीण आहे. मन भांबावून जाते. बाबांचे चरित्र वाचूनसुद्धा मी कोरडा राहिलो. खंत वाटते मनाला. पण असे असूनसुद्धा मी जे काही करीत आहे ते सोडण्याचा मात्र मनात कधी चुकूनसुद्धा विचार येत नाही. आहे की नाही गंमत?

एक मन सांगते, 'बाबारे तू जे करतो आहेस ती एक उपासना आहे. ती सदैव करीत रहा.' 'उपासनेला दृढ चालवावे, भूदेव संताशी सदा नमावे, सत्कर्मयोगे वय घालवावे, सर्वांमुखी मंगल बोलवावे.' इथे मन थोडे शांत होते. बाबा दयाळू आहेत. माझी मनःस्थिती ते जाणतात. मी सामान्य माणूस आहे. संसारी माणूस

आहे. मला माझी उपासना ही एक लबाडी का वाटते? तर त्या उपासनेच्या ठिकाणी ज्या प्रकारची अंतरीची तळमळ हवी आहे किंवा असावयास हवी तशी अजून निर्माण होत नाही. हेच माझे दुःख आहे. आणि म्हणून मला 'मी भक्त आहे का' या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देणे भाग पडते. ज्याना या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येत असेल ते खरोखर धन्य होत. त्यानी आपल्या देहाचे आणि जन्माचे सार्थक केले यात शंका नाही. असे असूनसुद्धा श्रीसाईनाथ डिरेक्टरीत आपले नाव छापून यावे म्हणून—कुठल्याही क्षेत्रात आमची कर्तबगारी शून्य असल्यामुळे—मी पण निर्लज्जपणे माहिती-तक्ता भरून पाठविला आहे. माझ्या लबाडीचा हा आणखी एक नमुना. मानवी मन हा एक अजबखाना आहे!

भक्त या शब्दावरून मला एक हरदासी कथा आठवते, ती सांगून हा लेख पुरा करतो. एकदा महाशिवरात्री आली. शंकराच्या सर्व देवळातून दर्शनासाठी भक्तांची फार गर्दी होणार होती. वाराणशीत काशीविश्वेश्वराच्या दर्शनासाठी दहा लाख लोक जमतील असा अंदाज बांधला गेला. हे सर्व ऐकून पार्वती कैलासात परमेश्वराला म्हणाली, 'देवा, मी खरे सांगते तुमचे हे सर्व भक्त जर कैलासास आले तर माझ्याने काही त्या सर्वांची उठबस होणार नाही. तुम्ही म्हणजे भोळे सांब सदाशिव. जे कोणी जे काय मागेल ते त्याला देऊन मोकळे, आणि मग दुसऱ्याना निस्तरायची पाळी येते.' शंकर म्हणाले, 'पार्वती, तुझे म्हणणे खरे आहे. पण मी जे काही देतो ते फक्त माझ्या भक्तांना.' यावर पार्वती म्हणाली, 'म्हणजे? काशीला तुमच्या दर्शनासाठी जे दहा लाख लोक येणार आहेत ते तुमचे सर्व भक्त नाहीत की काय?' शंकर म्हणाले, 'पार्वती, माझ्याबरोबर चल. मला तुला आज तेच दाखवावयाचे आहे.'

ताबडतोब पुढील दृश्य दिसू लागलेः—

काशीविश्वेश्वराच्या देवळाकडे जाणारा हमरस्ता. त्या रस्त्याच्या बाजुलाच जाण्यायेण्याच्या वाटेवर एक गलिच्छ पाण्याचे डबके. त्या डबक्यात एक महारोगी (शंकर) चिखलात पडलेला. बाहेर निघण्यासाठी धडपडत असलेला. काठावर लावण्यलतिका शुभ्र वस्त्र परिधान केलेली (पार्वती) त्या महारोग्याची पत्नी आक्रोश करीत बसलेली होती. जाणारे येणारे तिच्या रुपाकडे पाहून, काहीही विचारपूस न करता तिला ऐकू जाईल असे मोठ्याने आपआपसात बोलत होते. अर्वाच्य गाणी म्हणत होते. एक म्हणतो, 'अरे यार, क्या माल है, मेरा तो दिल टूट गया—' दुसरा म्हणतो, 'जय भोलेनाथ, मला हीच हवी—' असेच आणखी काही अश्लील प्रलाप—अधून मधून हे असेच चालू होते. शेवटी पार्वती म्हणाली, 'देवा, माझ्या कानानी मल ऐकवत नाही. पुरे झाले. चला घरी.' शंकर म्हणाले, 'पार्वती आणखी थोडी कळ सोस.' तळपत्या उन्हात पार्वती दमली होती. म्लान झाली होती. हळुहळू सूर्यास्ताची वेळ झाली. एक वयस्कर गृहस्थ त्याच्या नेहमीच्या वेळेवर काशीविश्वेश्वराच्या

दर्शनासाठी त्याच रस्त्याने येत होता. तो जवळ येताच त्याने पार्वतीला पाहिले आणि विचारले, 'मुली, तू इथे का बसली आहेस ? अशी चिंताक्रांत का ? तू रस्ता तर चुकली नाहीस ? तुला काही मदत हवी का ?' आस्थेने विचारपूस करणारा एकच माणूस निघाला. पार्वती म्हणाली, 'बाबा, माझे पती सकाळी पाय घसरून या डब-क्यात पडले आहेत. त्यांना बाहेर येता येत नाही, आणि मला काही त्यांना बाहेर काढता येत नाही. माझ्या मदतीला पण कोणी नाही. काय करू मी ?' 'मुली, चिंता करू नकोस,' असे सांगून तो गृहस्थ त्या डबक्यात उतरला. त्याने तिच्या नवऱ्याला हळूच बाहेर काढले. पार्वतीच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले. त्या माणसाचे घर तिथून जवळच होते. त्या दोघांना घेऊन तो घरी आला. त्या मुलीच्या नवऱ्यास त्याने स्वच्छ स्नान घातले, नेसावयास कपडे दिले आणि म्हणाला, 'मुली, सकाळपासून तुम्ही दोघे उपाशी आहात. कृपा करून आपण जेवावे नी मग सुखरूप जावे.' त्याने मग त्या दोघांना जेवू घातले आणि पहातो तो साक्षात् उमा आणि महेश्वर समोर उभी आहेत. त्याच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. त्याने दोघांना साष्टांग प्रणिपात केला आणि म्हणाला, 'देवा तुझी लीला अगाध आहे. माझे नेहमीचे शिवदर्शन आज चुकले, म्हणून तू मला माझ्या घरी येऊन दर्शन दिलेस. देवा माझ्यासाठी केवढे कष्ट पडले तुला ! या दासावर तुझी अशीच सदैव कृपा राहो एवढेच मागणे आहे.' परमेश्वर 'तथास्तु' म्हणून अंतर्धान पावले.

पुढे कैलासास पोहोचल्यावर शंकर पार्वतीला म्हणाले, 'पार्वती, आता तूच सांग, त्या दहा लाख भक्तांपैकी कितीजण कैलासास येण्याची शक्यता आहे. पार्वती म्हणाली 'देवा, मला आज समजले की भक्त म्हणजे पायली पासरीने मोजता येणारी वस्तू नव्हे. तुझ्यासारखा पारखीच पाहिजे की जो हिरा कोणता आणि गार कोणती हे बरोबर सांगू शकेल.' तात्पर्य निराळे सांगण्याची जरूरी नाही.

श्रीसद्‌गुरू साई बाबा, या लेकराला क्षमा करा. 'आवाहनं न जानामि नजा-नामि तवार्चनं । पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ॥ मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर । यत् पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तुमे । अन्यथा शरणंनास्ति त्वमेव शरणं मम । तस्मात् कारुण्यभावेन रक्षस्व परमेश्वर ॥

बाबा, यापेक्षा मी आणखी काय सांगू ?

वाचकांनी हा लेख वाचून वाटल्यास आपला हिशेब तपासावा. पण मला खात्री आहे माझ्या वर्गात असणारा दुसरा कुणीही नसेल.

# आशीर्वाद

**डॉ. के. भ. गव्हाणकर**
इंदिरा निवास, आग्रा रोड, कुर्ला, मुं. ७०

● बाल्यावस्थेत हिताहिताचे विवेकज्ञान नसल्यामुळे तो काळ असाच नष्ट होतो आणि म्हातारपणातील शेवटची काही वर्षे चिंताग्रस्त व रोगग्रस्त अवस्थेत व्यर्थ जातात व जीवनाचा जवळजवळ अर्धा भाग झोपेत नाहीसा होत असल्यामुळे, मनुष्याने तरुण असतानाच भक्तीच्या मार्गाला लागले पाहिजे आणि भगवंताची प्राप्ति करून घेतली पाहिजे. भक्त प्रल्हाद म्हणाले–'कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान भागवतानिह। दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम्। (श्री मद्‌भागवत ७-६-१)

ऋषि आणि साधुसंत जेव्हा सांगतात की जग नश्वर आहे, जीवन क्षणभंगूर आहे तेव्हा ते आपल्याला निराशावाद शिकवतात असे नाही, तर त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हाच असतो की माणसाच्या हाती कमी वेळ आहे आणि या कमी वेळातच महान लक्ष प्राप्त करून घ्यावयाचे आहे. म्हणून माणसाने वेळ न गमावता लवकरात लवकर लक्ष्यप्राप्तीच्या कार्याला लागले पाहिजे.

मानसशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास भक्तीच्या मुळाशी वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद आहे. आशीर्वाद–प्रेमाची भावना असते. प्रेम म्हणजे ईश्वराने मानवाला दिलेली महान देणगीच होय. या देणगीचा मानाने उचित उपयोग केला पाहिजे. जेव्हा हे प्रेम ईश्वराकडे वळविले जाते तेव्हा त्याला भक्ति म्हणतात, आणि जेव्हा हे प्रेम ऐहिक, भौतिक, अनित्य पदार्थाकडे वळविले जाते व जेव्हा ते या पदार्थां-तच अडकून पडते तेव्हा त्याला 'आसक्ति' असे नाव देतात. आसक्तीतून मोह उत्पन्न होतो आणि मोहामुळे मनुष्य दुःखात पडतो. संसार काय वा परमार्थ काय दोहोंच्या पाठीमागे आशीर्वादाची भिंत सतत उभी पाहिजे.

आशीर्वाद म्हणजे वडिलांनी लहानाना अंतःकरणपूर्वक इच्छिलेल्या कल्याणाचे उद्गार होत. अंतःकरणातील सदिच्छा ही आपणास दिसत नसली तरी तिचे सामर्थ्य कमी नसते. ज्याच्या कल्याणाविषयी ती असेल त्यावर ती श्रेष्ठ कार्य करू शकते. कळत वा नकळत ते कार्य होत असतेच. अन्नाने शरीर पोसले जाते तसे आशीर्वादाने अंतःकरण पोसले जाते. जीवन सर्वांगानी सुफलित होते. वृक्षाच्या मुळाशी जलसिंचन केले असता तो सर्वांगानी टवटवीत होतो. त्याच्या प्रत्येक पानागणिक ते जलबिंदू जाऊन पोहोचतात. प्रत्येक पुष्पातील सुवासास ताजेपणा आणतात, आणि फळामध्ये रसाळ-पणा उत्पन्न करतात. मुळास शिंपलेले जल दिसत नाही पण त्याचे कार्य मात्र दिसते. त्याप्रमाणे आशिर्वाद अदृश्य असला तरी संपूर्ण जीवनास व्यापून असतो. अंतःकरणा-तील प्रत्येक भावना, प्रत्येक विचार आणि प्रत्येक आचार यांना आशीर्वादाचे पोटी

असणाऱ्या प्रेमजलाचे बिंदूनी रसाळपणा येतो. श्री तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं' बीज शुद्ध असल्यावर फळेसुद्धा गोड त्याचीच असणार. आशीर्वाद हे शुद्ध बीजच होय. त्यामुळे त्याच्या पोटी रसभरित आणि गोमटी म्हणजे गोड फळे यावयाची.

आई, बाप आणि गुरुजन यांचे लहानांना सहज आशीर्वाद असतात. लहानांच्या कल्याणाची सतत काळजी वाहणे हा त्यांचा स्वभावच. चंद्राच्या ठिकाणी चंद्रिका, गुलाब पुष्पाचे ठिकाणी सुगंध, साखरेच्या ठिकाणी गोडी ही जशी सहज असतात त्याचप्रमाणे आईबाप आणि गुरुजन यांचे ठिकाणी लहानांच्या कल्याणाची कळकळ सहज असते, त्यात कृत्रिमपणा नसतो. आशीर्वाद ही फार मोठी देणगी आहे. जगातील सर्व देणग्यांहून ती श्रेष्ठ आहे, ती विनामूल्य सहज मिळणारी व कधी न सरणारी आहे. कारण वडिलांचे आपणास आशीर्वाद स्वभावतःच आहेत. हे ओळखणे म्हणजे ती मिळविणेच होय. वास्तविक आशीर्वाद मिळवावयाचे नसून ते प्राप्त आहेत हे ओळखावयाचे असते. हे ओळखणारास जगात कोठेही उणे पडत नाही.

कल्पतरू तळवटी जो कोणी बैसला।
काय वाणी त्याला सांगिजो जी ॥ ज्ञाने.

आशीर्वाद म्हणजे कल्पतरूच होत. त्याच्या सावलीखाली असणाऱ्या जीवांचे आयुष्य भाग्यशाली होय. वडिलांच्या अंतःकरणातील आपल्या विषयींची काळजी ओळखून वागल्यास त्यांचे आशीर्वाद सतत उचंबळून येतील. त्यांच्या अंतःकरणास जपणे म्हणजे आपल्या अंतःकरणाची कवाडे उघडून त्यांच्या आशीर्वादांच्या प्रेमकल्लोळांना वाट देणे होय. तसे न करणे म्हणजे स्वसुखास आचवणेच होय. एखादेवेळी वडिलांचा आपणावर राग झाला तरी त्या रागाचे रूपही ओळखले पाहिजे, राग निराळा आणि द्वेष निराळा. रागाच्या बुडाशी प्रेम असते व द्वेषाच्या बुडाशी खुनशी वृत्ति असते. जेथे आत्यंतिक प्रेम तेथेच आत्यंतिक राग असतो. आपलेपणा असेल त्या ठिकाणीच मनुष्य अत्यंत रागाने बोलतो. त्यात दुष्ट हेतु नसतो तर हिताची अत्यंत कळकळ असते. दिसायला राग पण असायला अत्युत्कट प्रेमोर्मि असते.

वरि वरि दाविसी मिथ्या कोप।
कोपूनि सांडविसी त्याचे पाप ॥
शेखीं सायुज्याचे दीप।
दाविसी सद्रूप दयाळुवा ॥ श्रीनाथम.

असे श्री एकनाथ महाराजांनी श्रेष्ठांच्या कोपाचे रूप वर्णिले आहे. जितकी थोर विभूति तितके त्यांचे आशीर्वाद थोरच असतात. आईबापांची काळजी स्वतःच्या मुलापुरती असते, परंतु श्रेष्ठ विभूतीचे प्रेम सर्व जगाला गवसणी घालण्याइतके अपरंपार असते. श्री साईमाऊलीचे, श्री गजानन माऊलीचे व श्री ज्ञानेश्वरमाऊलीचे अंतःकरण म्हणजे प्रेमाचे सागरच होय. त्या प्रेमसागरावरील लाटा (१) 'शिरडीचे साईबाबा'

आणि ' श्रीसाईसच्चरित्र ' (२) श्रीगजानन महाराजांची पोथी (शेगांव), (३) 'श्री ज्ञानदेवी ' ग्रंथाच्या रूपाने हेलावल्या.

श्री साईबाबांनी ' अल्ला भले करदेवे ' 'अल्ला अच्छा करेंगे ' हा आशीर्वाद आपल्याकरताच आहे हे ओळखणे म्हणजे त्याचे बिजारोपण होय. आपलेपणाने त्यांची वचने व वरील ग्रन्थ वाचणे आशीर्वादक आहेत; बाबांचे अंतःकरण होय. या अंतःकरणाची भेट प्रत्यही घ्यावी व या प्रेमलहरीवर आपले जीवन पोसावे. अत्यंत प्रेमाने व आदराने ही अक्षरे उच्चारताच आपल्या अंतःकरणाची पाऊलवाट करावी म्हणजे आपले जीवन सर्वांग सुफलित होईल.

●

# श्रीसाईलीला

— कै. श्री. बी. आर. काकडे,
तावडेवाडी, दहिसर

समाधि सोडोनि या बाहेरी ॥
उठा उठा साई ॥
पिडीत-जन आक्रंदती द्वारी ॥
आश्रय मागती पायी ॥

वरप्रमाणे आज आम्ही भक्तजन श्री सद्गुरू साईबाबांना अति नम्रतेने हाक मारीत आहोत. श्री बाबांनी समाधि घेऊन ५८ वर्षे पूर्ण होऊन गेलीत तरी त्यांचे विषयींची सद्भावना व त्यांनी दाखविलेल्या–शिकविलेल्या व अनुभव करून दिलेल्या "लीला" पुन्हा पहावयाची वेळ येऊन ठेपली आहे. आम्ही सर्व घरातील लोक श्रीसाईबाबांना नुसते "गुरू" मानत नाही, परंतु त्यांना "देव" मानतो. श्रीबाबांनी समाधिस्थ होईपावेतो आम्हा भक्तमंडळीवर जे अनन्य प्रेम केले व ज्या "लीला" करून दाखविल्या त्यांचा पुन्हा अनुभव घेण्याची वेळ आली आहे, कारण :—

अन्नवस्त्र ना मिळे कुणासी ॥
दरीद्र नांदे ते दारासी ॥
मार्ग दिसेना कुठे कुणासी ॥
जावे कोण्या — ठायी ॥

या प्रमाणे प्राप्त परिस्थितीत आम्ही भक्तजन श्रीसद्गुरू बाबांना हाक मारीत आहोत व एकसारखे :—

हवालदील होवोनिया आलो ॥
चरणी ठेवितो डोई ॥

बाबा! आज या जगात आपणाशिवाय आम्हास कोणी " **वाली** "उरला नाही व दिवसेदिवस आम्ही कितीही चालू ' अणु-युगा ' मध्ये पुढे गेलो असलो किंवा जात असलो तरी जो पावेतोः-

नीती नुरली धर्म बुडाला ॥
स्वार्थंची एक दिसे अवध्याला

असे वाटते, तोपावेतो, आम्ही, चालू "विज्ञान युगात कितीही **ज्ञानी** झालोत व कोणत्याही मार्गाने कितीही **लक्ष्मी** प्राप्त केली तरी ते ज्ञान व ती लक्ष्मी आमचेपासून दुरावत चालले आहेत व म्हणूनच आम्ही सर्व लोक आपणास **देव** मानतो."

२. या भारत-भूमीत पूर्वीच्या इतिहासाकडे जर **लक्ष** टाकले तर असे दिसून येते की- त्या परमकृपाळू-दयाळू-मायाळू भगवंताने (श्रीविष्णूने) या भारतभूमीवर **'दशावतार'** धारण करून नानाविध **'लीला'** आम्हा 'मनुष्य जातीच्या' प्राण्यांना दाखविल्या. ज्यावेळी भगवंताने ही भूमी (**EARTH**) तयार करून त्यावर पाणी, हवा व तेज प्रस्तुत केले व **जलचर-वनचर** आणि **हवेत उडणारे प्राणी** तयार करून त्यांना ' भगवंताच्या लीला ' पहावयास लाविल्या व त्यांचा अनुभव घ्यावयास लाविले. परंतु या सर्व प्राणीमात्रास **'वाचा'** म्हणजे शब्द बोलून एकमेकाशी **वाद-विवादाद्वारे** ' ज्ञानवृद्धि ' करण्याची बुद्धि दिसली नाही. म्हणून त्याने (भगवंताने) 'मनुष्य (पुरुष) प्राणी ' उत्पन्न केला व ' **आपल्या जगातील लीला** ' पहावयास त्यास लाविले. परंतु हा पुरुष प्राणी जितका प्रभावी व्हावयास पाहिजे तितका तो दिसून न आल्याने त्याने (भगवंताने) ' **स्त्री** ' उत्पन्न केली व पुरुषाचे सोबतीस सोडली व आता ' **आपल्या लीला** ' ही जोडी चांगली शोधून काढेल असे भगवंतास वाटले परंतु झाले उलटेच.

आमचे "पूर्वज" श्री विष्णू (GOD) पासून फार दूर जावू लागले व या जगात नाना प्रकारची संकटे उत्पन्न होऊन "पृथ्वी" (देवाची आवडती पृथ्वी) लयास जावू लागली. श्रीकृष्णाने (श्री विष्णूचे आठवे अवतार) "यदा यदाही धर्मस्य-ग्लानी-र्भवती भारत" या वचनाने या पृथ्वीवर पुन्हा पुन्हा अवतार घेऊन मानव जातीचे "रक्षण" केले. तरीपण या "**भगवंतास**" शोधण्यासाठी व्यापार युगापासून आज कलीयुगापावेतो (कलीयुगाची पाच हजार वर्षे होऊन गेली आहेत) **"तो भगवंत व त्याच्या लीला"** आम्ही शोधू शकलो नाही.

३. या **लीला** शोधण्यास श्री भगवंताचे खास दूत **"संतरूपाने"** या जगात अवतरले व त्यांनी आम्हा जनसमुदायास श्री भगवंतापावेतो पोहोचविण्याची व श्री भगवंताची **आशीव** करून देण्याची महत्त्वपूर्ण अशी "अमोल" कामगिरी केली त्या

कामगिरीसच आम्ही "लीला" (कर्म) असे समजतो. आजचे कलियुगात आपण जरासे मागे पाहिले तर असे दिसून येईल की :—

१. श्रीसंतज्ञानेश्वर माऊलीने निर्जीव भिंत चालवून 'लीला' दाखविली.
२. श्रीसंत नामदेव महाराजांनी यवनांचे काळात 'मृत-गाई' जिवंत करून 'लीला' दाखविली.
३. श्रीसंत मीराने विषाचा प्याला ग्रहण केला तेव्हा खुद्द भगवंत (पाषाणरुपी) काळे निळे झाले. ही पण लीलाच दाखविली.
४. श्री नरसी मेहेता, रोहिदास चांभार, गोरा कुंभार, सावता माळी, श्रीसंत एकनाथ महाराज असे—

एक ना अनेक जातीतील नानाविध संतांनी एक प्रकारच्या 'लीला' करून आम्हा भक्त मंडळींना त्या परम कृपाळू भगवंताची जाणीव करून देत राहिले व म्हणूनच बाबा– आम्ही तुम्हाला नुसते 'संत' समजत नाही परंतु खुद्द भगवंत समजतो.

महाराष्ट्र भूमीत कित्येक संत ॥
तसे साधू निर्माण झाले अनंत ॥
किती लोक कल्याण केले तयांनी ॥
महा संकटी रक्षिला धर्म ज्यांनी ॥

अलीकडे म्हणजे १९ वे शतकाचे शेवटी व चालू २० वे शतकाचे सुरुवातीस–

गुरु साईबाबा जणू मायबाप ॥
करूं या तयांचीच सेवा अमुप ॥
कृपेचीच मूर्ती - दयेचा समुद्र ॥
कधी चिंतीले नाही, कोणा अभद्र ॥

याप्रमाणे आपण आम्हा भक्त मंडळीस दिसलात व त्याप्रमाणे आम्ही भक्त मंडळी ज्या ज्या वेळीं आपण ह्यातीत (शिरडीत) असताना आपले सान्निध्यात आलो तेव्हा आम्हा भक्तमंडळीस असे दिसले की :—

किती भक्त दुःखातुनीया मुक्त केले ॥
किती संकटातुनीया सोडविले ॥
किती रोगीयांना दिले जीवदान ॥
गुरू साईबाबा किती धन्यवान ॥

या प्रमाणे आपले "संतरुपी" जीवन व त्याचा "सरस सहवास" आम्हास लाभला त्यावेळी असे वाटले कीः—बाबांनी आम्हा भक्तमंडळीवर नानाविध उपकार केले आहेत.

४. या जगात व त्याचप्रमाणे या भारतात सर्व थरातील जातीत संतलोक होऊन गेलेत, परंतु ज्या ज्या वेळीं आम्ही आपणाकडे पहातो – आपणास पहाण्याची

इच्छा करतो त्या त्या वेळी आम्हास असे दिसून येते की "**आपल्या संतभूमिकेत**" बराच फरक आहे. कारण आपण सर्वांस ह्यातीत, जात, भेद, वर्ण **न पहाता** तसेच गरिबी-श्रीमंती न पहाता **केवळ** मानव जातीची सेवा केलीत तेव्हा आपल्या "**लीला**" किती मोठ्या आहेत त्याची कल्पना करवत नाही. सुरवातीस आम्ही आपणास **साधे फकीर** समजलो. आपली भिक्षाटणाची वृत्ती पाहून आपण "भिक्षा मागणारे वेडे फकीर" आहात असे आम्हास वाटले. आपण कोठून आलात – कोणत्या धर्माचे–व आपले नाव-गाव याचा तपास न करता आपणावर नाना प्रकारचे तर्क-वितर्क करीत बसलो. आपली योग्यता किती–आपण कोणत्या थरातील–चराचरात भरलेला भगवंत आपले ठिकाणी **वास** करीत आहे याची **जाणीव** आम्हा भक्त मंडळीस सुरूवातीस जेव्हा आपणास पाहिले त्यावेळी मुळीच झाली नाही. बाबा – आम्ही भक्तमंडळी, आपणा पर्यंत – आपले पवित्र चरणापर्यंत पोहोचण्यास याच जन्मी काय पण जन्म-जन्मांतरीसुद्धा समर्थ नाही. **परंतु आपण अति दयाळू अंतःकरणाने** आम्हा भक्त मंडळीस आपले चरणाजवळ बसण्याची सुवर्ण संधि दिलीत व एक सर्वसाधारण इसमा (Common Man) प्रमाणे आम्हा भक्त मंडळीवर जे **अमोल** प्रेम केलेत ते आम्ही कसे विसरू शकू ? आपले शिरडीतील वात्सल्यात त्या परमकृपाळू "भगवंताच्या" अनेक "लीला" करून दाखविल्या. आपले भक्त मंडळीत ज्यावेळी अतिशय वाढ होऊ लागली त्यावेळी **काही प्रसंगी** आपण आम्हास प्रत्यक्ष 'भगवंत' दिसलात. श्रीरामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाने आपण आम्हा भक्तमंडळीकडून करवून घेत असता. श्रीरामाचा पाळणा व श्रीकृष्णाची दहीहंडीसारखे प्रसंग आम्हा भक्त मंडळीस जेव्हा दिसले व ते अनुभवले तेव्हा आपली भूमिका श्रीकृष्णाप्रमाणेच वाटत असे —

कारण :—

साई कान्हाचे गोपी गोपाळ बहू ॥
द्वारकामाईत जमती रे ॥धृ०॥
शिंप्याचा काशा–भिल्लाचा अप्पा ॥
भटाचा शाम्या गमती रे ॥ १ ॥
कोत्याचा घोडमुख्या–वामन बाबूराव ॥
रघुजी त्या संग रमती रे ॥ २ ॥
कोंडाजी, अंडाजी, डॉ. पीळे–गेनुमामा ॥
शिपुरडा गुरवडा गमती रे ॥ ३ ॥
नाना काका–लंगडा काका–आप्पा सोनारडा ॥
हेमाड, गणू, भाऊ किंमती रे ॥ ४ ॥
मोठा काका–बाळसाब प्रधान, बडेबाबा ॥

बयाजी–रामचंद्र हिंमती रे ॥ ४ ॥
साईकान्हाचे गोपी गोपाळ बहू ॥
द्वारकामाईस जमती रे ॥ ५ ॥

याप्रमाणे आपले शिरडीतील पवित्र ठिकाणी या भक्त मंडळीस पाहिले की ‘श्रीकृष्ण व त्याचे सवंगडीची आम्हा भक्त मंडळीस आठवण होत असे. बाबा, आपले पवित्र शिरडी क्षेत्री जोपर्यंत वास्तव्य होते ( आजही आहे परंतु समाधिरूपाने ) त्यावेळी हासते, खेळते, बोलते–जिवंत बाबा आम्हा भक्तमंडळीमध्ये समरसलेले होते.

एक ना अनेक असे कितीतरी प्रसंग आठवतात की जेणे करून आपल्या ‘लीला’ आम्ही या जन्मी काय – कोणत्याही यापुढे येणाऱ्या जन्मी विसरू शकणार नाही. बाबा, आपले, भक्त मंडळीवरील प्रेम नुसते “मानवाचे औपचारिक” प्रेम नव्हते. ते आणि पवित्र शुद्ध व अमोल होते. आम्ही भक्त मंडळी व्यवहारीक क्षेत्रात किती वर र गोड बोलतो, परंतु प्रत्यक्ष कृतीत ते उतरवत नाही व त्यामुळेच की काय आम्ही आपले दुःख कमी करू शकत नाही.

५. या भारतभूमीत ‘संक्राती’ सारख्या मोठ्या सणी आम्ही सर्व थरातील लोक ‘तिळगूळ’ देण्या-घेण्याचा व्यवहार करतो व एकमेकावरील प्रेम (Outer Love) मोठ्या कौतुकाने जाहीर करतो. हे प्रेम आम्ही कित्येक वेळा आमचे ज्यांचेशी वाकडे असले तरी ‘संक्राती’चे दिवशी ‘तीळगूळ’ देऊन प्रेम व्यक्त करतो परंतु आपणास बाबा याप्रसंगी तीळगूळ देताना आम्हा भक्त मंडळींना त्याप्रमाणे मुळीच वाटत नाही–कोणत्याही प्रकारचे **तर्क वितर्क** किंवा उसने प्रेम येत नाही. नैसर्गिक मायेने आपणाकडे आम्ही आकर्षित होतो व आपणास आपले “**पवित्र करी**” तीळगुळ देताना आम्हास असे वाटते :—

तीळगुळ घ्या आणि गोडगोड बोला ॥
साईनाम घ्या आणि गोडगोड बोला ॥ धृ० ॥
संक्रांतीचा हा रवि आला उदयाला ॥
क्षणी क्षणी सांगतसे तो जनसमुहाला ॥
शुद्ध अंतरी भाव धरुनी, स्मरा साईला ॥ १ ॥
साईनामाचा महीमा कोणी नाही जाणीला ॥
नवनाथाच्या या मुकूट मणीला स्मरायाला ॥
जालंदर, मच्छिंदर, गोरख आहेत दायाळा ॥ २ ॥
संतशिरोमणी साईबाबा जगी आले या ॥
कोणा माहीत कोण धर्मी वा कोण जातीचे या ॥
सर्व धर्मांचा पंथ मानीतो साईनामाला ॥ ३ ॥

भक्त भावनेने गेले पूज्य शिरडीला ॥
जेथे अवतरले होते धन्य साईबाबा ॥ ४ ॥
दर्शन घेऊनी तृप्त झाले मनी आपुल्या या ॥
पूज्य भावनेने मिळतसे शुद्ध सेवेचा मेवा ॥
तो सेवुनी तो सुखी होऊ द्या आपुल्या चित्ता ॥
दास काळे म्हणे, एकच मार्ग, स्मरा साईला ॥ ५ ॥

बाबा! एक ना अनेक बारोमासी येणारे सण, आपण स्वतः, त्या भगवंताच्या "लीला" आम्हास कृतीत करून उतरवून दाखविल्यात. आपण **एक वीत रुंद** फळीवर, साध्या चिंध्या बांधून मशीदीत, आडाला टांगून त्या फळीवर चारी कोपऱ्यावर **"जळत्या पणत्या"** ठेवून, शयन करताना जेव्हा आम्हा भक्त मंडळीस दिसत, तेव्हा **"आपले योगसामर्थ्याची"** कल्पना करवत नसे. रिद्धि-सिद्धी आपल्या जवळ **सातत्याने** रहात असत, त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे, कारण आपण आपली आतडी जेव्हा ओढ्यावर धुवून वाळवीत असताना आम्हास दिसत तेव्हा आम्ही चक्क थक्क होऊन Thrilled जात असू. आपली कक्षा Sphere किती मोठी आहे त्याची कल्पना सुद्धा आम्ही करू शकत नव्हतो. आपले आम्हा भक्त मंडळीवरील निष्पाप प्रेमाचा, आम्ही योग्य तो लाभ घेऊ शकलो नाही किंवा घेऊ शकणार नाही. कारणः—

आई ती आई बहु मायाळू ॥
लेकरा लागी अती कनवाळू ॥
परि लेकरेंच निघता टवाळू ॥
कैसा सांभाळू करी ती ॥

परंतु बाबा! आपले बाबतीत आम्हास फारच निराळा अनुभव येत असेः—

मोठी कृपाळू ही मशीद माई ॥
भोळ्या भाविकांची ही आई ॥
कोणी कसाही पडो आपाई ॥
करील ही ठायीच रक्षण ॥

बाबा! आपल्या "लीला" किती अमर! किती मौल्यवान! किती उपयोगी! हे आम्ही आपले सान्निध्यात असताना समजू शकलो नाही. परंतु त्यांची आज नुसती आठवण जरी झाली, तरी ती (आठवण) अति आकर्षक वाटते. एके प्रसंगी आपण ध्यानस्थ असता "धुनि" मध्ये एकदम हात घालून आम्हा भक्त मंडळीस मोठा धक्काच बसला. आपला हात जेव्हा खेचून बाहेर काढला तेव्हा त्यावरील **सबंध चामडे** जळून गेले होते व ते "दृश्य" पाहून आमचे काळीज चरफडले. श्रीयुत नानासाहेब चांदोरकर यांना ज्यावेळी ही गोष्ट कळली तेव्हा त्यांनी **परमानंद**